# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

---

**दिनांक १३.०८.२०२६ गुरुवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक १२.०८.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. कायद्यान्वये ०१ केसेसमध्ये ०३ ईसमावर कारवाई करून एकुण ५,१४०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०३ केसेसमध्ये ०३ इसमांवर कारवाई करुन ५,९१५/— रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,२४१ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,९९,७००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

दिनांक १२.०८.२०२६ चे ११.०० वा. ते दिनांक १३.०८.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये एकुण ०१ इसमावर कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा सामाजीक सुरक्षा विभाग पोलीसांची कामगिरी :— देहव्यवसाय करवुन घेणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १२.०८.२०२६ चे १८.२३ वा. चे सुमारास, गुन्हेशाखा सामाजीक सुरक्षा विभाग पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना अवैध देहव्यापाराबाबत मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत, जे एस लॉजिंग रेस्टारेंट, वार्ड क्र. २, भिलगाव, कामठी रोड, नागपूर येथे पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे आरोपी १) शिवशंकर रघुजी पटले वय २४ वर्षे, रा. गर्रा वार्ड क्र. ५, ब्राम्हण टोली, वाराशिवनी जि. बालाघाट, मध्यप्रदेश हा पाहिजे आरोपी क्र. २) बब्बु उर्फ कुलजितसिंग रैन रा. नागपूर याचे मदतीने घटनास्थळी स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता महिला व अल्पवयीन मुलींना कमी वेळात जास्त पैसे कमविण्याचे आमिष दाखवून त्यांना देहव्यापाराकरीता प्रवृत्त करुन जागा व ग्राहक उपलब्ध करवून देऊन, त्यांचेकडून देहव्यापार करुन घेतांना समक्ष मिळून आला. घटनास्थळावरुन एक अल्पवयीन मुलगी व दोन सज्ञान महिला असे ०३ पिडीतांची सुटका करण्यात आली आहे. आरोपीचे ताब्यातुन रोख २,०००/—रू., ०१ मोबाईल फोन व इतर साहित्य असा एकुण किंमती अंदाजे १२,४१०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी विरूध्द पोलीस ठाणे यशोधरानगर येथे कलम १४३(२),१४३(३) भा.न्या.सं., सहकलम ३,४,५ अनैतिक देहव्यापार प्रतिबंधक अधिनियम सहकलम ७५ जेजे ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव यशोधरानगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले.

वरील कामगिरी नागपूर शहर चे मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे

मार्गदर्शनाखाली पोनि. दर्शन पाटील, सपोनि. शिवाजी ननावरे, मपोहवा आरती चव्हाण, पोअं. अश्विन मांगे, नितीन वासने, समिर शेख, कमलेश क्षीरसागर व मपोअं पुनम शेंडे यांनी केली.



**३) गुन्हेशाखा युनिट क. १ पोलीसांची कामगिरी :— देहव्यवसाय करवुन घेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १२.०८.२०२६ चे ०८.१५ वा ते ०८.५० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. १ चे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना अवैध देहव्यवसायाबाबत मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, त्यांनी पोलीस ठाणे प्रतापनगर हद्दीत, त्रिमुर्ती नगर, भाग्यश्री ले आऊट येथे किरायाने राहणारी महिला नामे मिनाक्षी अरुण मारचेट्टीवार वय ६० वर्ष हिचे राहते घरी पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे आरोपी महिला ही स्वतःचे आर्थिक फायद्याकरीता ०२ पिडीत महिलांना पैशांचे आमिष दाखवून घटनास्थळी जागा व ग्राहक उपलब्ध करुन देऊन त्यांचेकडून अनैतिक देहव्यापार करवून घेताना मिळून आली. आरोपींचे ताब्यातुन रोख २७३०/— रु, ०१ मोबाईल व इतर साहित्य असा एकुण किंमती अंदाजे १२,८८०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी विरूध्द पोलीस ठाणे प्रतापनगर येथे कलम १४३(२) भा.न्या.सं., सहकलम ३,४,५,७ अनैतिक देहव्यापार प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून आरोपी महिला व पिडीता यांना मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव प्रतापनगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले. पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. राजेंद्र दाभाडे, मा. पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन) श्री. दीपक अग्रवाल, मा. सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) श्री. वैभव जाधव यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. प्रशांत ठवरे, पोउपनि ओमप्रकाश कोठे, सफौ. देशमुख, पोहवा योगेश वासनिक, नितीन वासनिक, मनोज टेकाम, पोअं. कुणाल गेडाम, पकंज, मपोअं दिव्या व दुर्गा यांनी केली.



**४) यशोधरानगर पोलीसांची कामगिरी :— वाहन चोरास अटक, ०३ गुन्हे उघडकीस.**

दिनांक १२.०८.२०२६ चे ०५.१० वा. चे सुमारास, यशोधरानगर पोलीसांचे पथक पेट्रोलींग करीत असता, भिलगाव नाल्याजवळ एक इसम संशयास्पदरित्या फिरतांना दिसल्याने, त्याचा पाठलाग करुन त्यास

ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारला असता, त्याने त्याचे नाव शेहबाज उर्फ गोलु शानाबुल्ला वय २३ वर्ष रा. गली क्र. ३, मोहन गार्डन, उत्तम नगर, वेस्ट दिल्ली ह.मु. आजरी–माजरी, मदिना मस्जिदजवळ, यशोधरानगर, नागपूर असे सांगितले. त्यांची अंगझडती घेतली असता, त्याचे जवळ एक धारदार शस्त्र मिळून आले. त्याचेजवळील काळया रंगाची प्लेझर मोपेड क्र. एमएच ३१ बीएच ८१९७ चे कागदपत्रांबाबत विचारणा केली असता, त्याने उडवाउडवीचे उत्तरे दिल्याने, त्यानेजवळील वाहन चोरीचे असल्याचे संशयावरुन त्यास पोलीस ठाणे येथे आणुन त्याचेविरुध्द कलम ४,२५ भाहका सहकलम १२४, १३५ मपोका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपीची सखोल विचारपुस केली असता, त्याने गुन्हयातील वाहन ऑटोमोटिव्ह चौक, मेट्रो स्टेशन पार्कींग येथुन चोरी केल्याची कबुली दिली. आरोपीने वर नमुद गुन्हयाव्यतिरिक्त पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीतुन एक काळया रंगाची ज्युपिटर मोपेड क्र. एमएच ४९ सीजी २९०७ तसेच एक ग्रे रंगाची सुझुकी ॲक्सेस क्र. एमएच ३१ ईबी ३३२६ असे एकुण तीन वाहन चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन गुन्हयातील तिन्हा वाहने एकूण कि. १,७०,०००/– रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. श्री नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (कळमणा विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. युनुस शेख, पोउपनि अनंत पाटील, पोहवा राहुल बोंद्रे, अशोक तायडे, पोअं. मनिष झरकर, संदीप वानखेडे, क्षितेश चौरसिया, भुषण येरोजवार व प्रदीप बावणकर यांनी केली.

**<u>५) गुन्हेशाखा युनिट क्र. १ पोलीसांची कामगिरी :– कॅसिनो मशिन द्वारे जुगार खेळणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक १२.०८.२०२६ चे १६.४५ वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट क्र. १ पथकातील अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असता, त्यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरुन, पोलीस ठाणे वाडी हद्दीत, संत ज्ञानेश्वर ले आऊट, दत्तवाडी येथील सागर व्हिडीयो गेम पार्लर येथे पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे इलेक्ट्रानिक व्हिडीयो गेम मशिनवर दुकान चालक आरोपी क्र. १) हेमंत भोजराज निखाडे वय ३३ वर्षे रा. प्लॉट क्र. ७६, गुलशन नगर, कळमणा हा आरोपी क्र. २) इम्तियाज अब्दुल कलाम अन्सारी वय २९ वर्षे रा. रामकृष्ण हॉल, दत्तवाडी, नागपूर यास समक्ष कसिनो मशिनच्या माध्यमातुन पैश्यांची बाजी लावुन हार–जीतचा जुगार खेळवितांना मिळुन आला. आरोपींचे ताब्यातुन रोख ९६०/–रू., वेगवेगळया ११ कसिनो मशिन व ईतर साहित्य असा एकुण ९२,५६०/– रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी क्र. १ यास अधिक विचारपुस केली असता, त्याने कोणताही परवाना नसुन दुकानमालक, पाहीजे आरोपी आशिष आत्माराम निखाडे वय ४५ वर्ष रा. राजेंद्र वार्ड, तुमसर जि. भंडारा हा असल्याचे सांगितले. आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता संगनमताने विनापरवाना अवैधरित्या मशिनीद्वारे जुगार खेळवितांना मिळून आल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे वाडी येथे कलम ४,५ महा. जुगार प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. आरोपींना मुद्येमालासह वाडी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. राजेंद्र दाभाडे, मा. पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन) श्री. दीपक अग्रवाल, मा. सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) श्री. वैभव जाधव यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. प्रशांत ठवरे, पोउपनि ओमप्रकाश कोठे, पोहवा योगेश वासनिक, नितीन वासनिक, मनोज टेकाम, पोअं. कुणाल गेडाम, मंगेश बोरकुटे यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे जुनी कामठी :— हद्दपार ईसमास शस्त्रासह अटक.**

दिनांक १२.०८.२०२६ चे २३.४५ ते १३.०८.२०२६ चे ००.२० वा. चे दरम्यान, जुनी कामठी पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, दरोगा मस्जिदजवळ, वारीसपुरा येथे एक हद्दपार इसम फिरत आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे मिळालेल्या वर्णनाचा इसम पोलीसांना पाहुन पळुन जात असता, त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव मोहम्मद शाहीद वल्द एजाज अन्सारी वय ४२ वर्षे रा. वारीसपुरा, कामठी, नागपूर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे कंबरेत एक धारदार लोखंडी चाकु मिळून आला. त्यास पोलीस ठाणे येथे आणुन, त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०६ यांचे हद्दपार आदेश क्र. ०८/२०२६ दिनांक २२.०४. २०२६ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने शस्त्रासह समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, फिर्यादी पोअं अमित ताजणे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जुनी कामठी येथे पोउपनि. स्वप्निल चव्हाण यांनी आरोपीविरूध्द कलम १४२,१३५ म.पो.का. सहकलम ४,२५ भाहका अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे जरीपटका :— जिवे ठार मारणाऱ्या आरोपीविरुध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १३.०८.२०२६ चे ०१.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे जरीपटका हद्यीत, एनआयटी गार्डन जवळील गल्ली, कुशीनगर येथे फिर्यादीचा मुलगा नामे राजविर सोहनकुमार शर्मा वय १८ वर्ष रा. प्लॉट क्र. ५९, कुशीनगर, नागपूर यास आरोपी क्र. १) राज ईलमकर वय २२ वर्ष २) रोहीत ईलमकर वय २० वर्ष दोन्ही रा. एनआयटी गार्डन जवळ, कुशीनगर, जरीपटका ३) हनी डोगरे वय २५ वर्ष रा. कुशीनगर, जरीपटका, नागपूर यांनी संगनमत करुन जुने भांडणाचे कारणावरुन फिर्यादीचे मुलास शस्त्राने वार करुन गंभीर जखमी केले. तसेच त्याचा मित्र नामे नयन सोनबरसे हा मध्ये वाचविण्यास गेला असता, त्यालाही जिवे ठार मारण्याचे उद्येशाने शस्त्राने वार करुन जखमी केले. जखमी यांना उपचाराकरीता, विम्स् हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी फिर्यादीचे मुलास तपासुन मृत घोषित केले. जखमी नयन याचा उपचार सुरु आहे.

यांप्रकरणी फिर्यादी सौ. शालु सोहनकुमार शर्मा वय ४० वर्ष रा. प्लॉट क्र. ५९, कुशीनगर, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे जरीपटका येथे सपोनि कपिल म्हस्के यांनी आरोपीविरुध्द कलम १०३(१),१०९(१),११५(२),३५१(३),३५२,३(५) भान्यासं. अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपींचा शोध व पुढील तपास सुरु आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे सिताबर्डी :—**

**अ)** दिनांक १२.०८.२०२६ चे १३.४५ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीत, वसंतराव देशपांडे सभागृह गेटजवळील फुटपाथवर एका तीनचाकी हातरिक्षामध्ये एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ६० ते ६५ वर्षे वयाचे, ईसम फुटपाथ बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे सिताबर्डी येथे संपर्क साधावा. मृतकाचे वर्णन—डोक्याचे केस—पांढरे, दाढी—पांढरी, अंगात—निळया रंगाचा हॉफ टिशर्ट व काळया रंगाचा फुलपॅन्ट घातलेला आहे.

**ब)** दिनांक १२.०८.२०२६ चे १४.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीत, मिठानीम दर्गाह जवळ, भिंतीलगत फुटपाथवर एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ६५ ते ७० वर्षे वयाचे ईसम फुटपाथ बेशुध्द

अवस्थेत मिळुन आल्याने त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे सिताबर्डी येथे संपर्क साधावा. मृतकाचे वर्णन—डोक्याचे केस—पांढरे व अर्धवट टक्कल असलेले, दाढी—पांढरी, अंगात— निळया रंगाचा हॉस्पिटल गणवेश घातलेला आहे.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे सिताबर्डी येथे पोउपनि. अमोल नागरिक यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरु आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे पाचपावली :—** कु. ममता मोहन चौधरी वय १४ वर्षे, रा. मेहंदीबाग पुलाचे खाली, फुटपाथवर, पाचपावली, नागपूर ही दिनांक २५.०७.२०२६ पासुन पोलीस ठाणे पाचपावली हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग—सावळा, चेहरा—गोल, बांधा—सडपातळ, उंची—४ फुट ६ इंच, डोक्याचे डोळे—काळे, केस— काळे, अंगात— गुलाबी रंगाची कुर्ती घातलेली आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलते. ओळखचिन्ह—हनुवटीवर मोस आहे.



कु. ममता

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**